## रे. दि. मु. नं. ६९/२०१७ मधील निशाणी क्र. ४४ चे अर्जावरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्ती करण्याकरिता परवानगी मिळण्याकरता दाखल केला आहे. प्रतिवादींतर्फे प्रस्तुत अर्जाचे पाठीमागील बाजूस त्यांचे म्हणणे दाखल केले आहे.

२) प्रस्तुत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, सदर कामी प्रतिवादी क्र. १ मयत आहे. प्रतिवादी क्र. १ चे वारस प्रतिवादी क्र. २ ते ४ हे आहेत अशी यापूर्वी पुरसिस दिली आहे. प्रतिवादी क्र. १ चे पुढे मयत असा शब्द लिहण्यास व दुरूस्ती प्रत देणेस परवानगी देण्यात यावी अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

३) प्रतिवादींतर्फे प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले. प्रतिवादींतर्फे असे म्हणणे दाखल केले आहे की, प्रस्तुत कामातील प्रतिवादींनी प्रतिवादी क्र. १ हे मयत झालेबाबत पुरसिस ही दि. ०८.०९.२०२१ रोजी मे. न्यायालयात दाखल केले होते. सदरील वादी हे जाणूनबुजून वेळेत सदरची दुरूस्ती मागितलेले नाहीत. मे. न्यायालयाचा बहुमूल्य वेळ घालविल्याने वादीवर जास्तीत जास्त खर्च बसविण्यात यावे व न्यायाच्या अनुषंगाने योग्य ते आदेश व्हावेत अशी विनंती प्रतिवादींतर्फे करण्यात आली आहे.

४) अर्ज व म्हणणे वाचले. प्रकरण संचिकेचे व सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षकारांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५) प्रतिवादींनी मयत प्रतिवादी क्र. १ याचे वारस प्रतिवादी क्र. २ ते ४ असल्याची बाब नाकारलेली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ च्या मृत्यूमुळे दावा त्याचेबाबत अवसान पावतो असे होत नाही. प्रतिवादी क्र. १ चे वारस म्हणून प्रतिवादी क्र. २ ते ४ पूर्वीपासूनच दाव्यात सामील असल्याने प्रतिवादी क्र. १ चे नावासमोर मयत असे लिहिण्याकरिता करावयाची दुरूस्ती तांत्रिक स्वरूपाची आहे. तिच्यामुळे दाव्याच्या स्वरुपात बदल संभवत नाही. सदरची दुरूस्ती दावा प्रलंबित कालावधीत घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने असल्यामुळे ती मंजूर करण्यास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ चे परंतुकाचा प्रत्यवाय नाही. तथापि, त्याचवेळी प्रतिवादी क्र. १ हे दि. २७.०५.२०२१ रोजी मयत झाल्यानंतर वादीने सदरचा अर्ज दि. ०२.१२.२०२१ रोजी विलंबाने दाखल केला असल्याने त्याबद्दल वादीने प्रतिवादींना खर्चाची रक्कम देण्याचे आदेशीत करणे गरजेचे आहे. प्रकरणात झालेल्या सात महिन्यांच्या विलंबाचा व दरम्यानचे कालावधीतीत कोव्हीड–१९ चे प्रादुर्भावाने असलेल्या टाळेबंदीचा विचार केला असता वादीने प्रतिवादींना खर्चाची एकूण रक्कम रू. २००/– देण्याचे आदेशीत केल्यास प्रस्तुत प्रकरणात न्यायोचित समतोल साधला जाईल असे माझे मत आहे. या सर्व कारणमिमांसेचा विचार करून मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. प्रस्तुत अर्ज नि. क्र. ४४ वादीने प्रतिवादींना एकूण खर्चाची रक्कम रू. २००/– देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने वर आदेशीत केल्याप्रमाणे खर्चाची रक्कम प्रतिवादींना अदा केल्यानंतर प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १ चे नावासमोर मयत असे लिहिण्यासाठीची दुरूस्ती मूळ दाव्यामध्ये करण्याची वादीस परवानगी देण्यात येते.

३. वादीने सदर आदेशाच्या अनुषंगाने आवश्यक त्या दुरूस्त्या मूळ दाव्यात ज्या त्या ठिकाणी वैधानिक कालावधीमध्ये करून घेवून दुरुस्त दाव्याची प्रत दाखल करण्याचे वादीस निर्देशित करण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/–

स्थळ:– जत
दि. १९.०१.२०२२

(एकनाथ को. चौगले)
(JO Code -MHSN2400)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जत

**प्रमाणपत्र**

मी असे प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर व मूळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| स्टेनोग्राफरचे नांव | श्री. एस.ए. जमादार (लघुलेखक श्रेणी-III) |
| कोर्टाचे नांव | श्री. एकनाथ को. चौगले.<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग<br>न्यायदंडाधिकारी, जत. |
| दिनांक | १९/०१/२०२२. |
| पीठासीन अधिकारी यांनी<br>सही केलेली तारीख | १९/०१/२०२२. |
| आदेश अपलोड केलेली तारीख | १९/०१/२०२२. |